महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका,
जावक क्रमांक : मआ/८/१५०० (?)
दिनांक: १६/१२/२०२०

## कार्यालयीन आदेश

**विषय - पूर्वगणनपत्रकांचे तपासणी व तांत्रिक मान्यतेबाबत**

शहर विकासाच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेमार्फत महत्वाचे व मोठे प्रकल्प राबविणेत येतात. सदरच्या महत्वाच्या प्रकल्पांची आखणी करताना व त्या अनुषंगाने आवश्यक ती पूर्वगणनपत्रके तयार करताना या प्रकल्पांच्या विकास कामांसाठी लागणारा कालावधी, येणाऱ्या तांत्रिक अडचणी, भविष्यात उद्भवणाऱ्या विविध गरजा, कामाची गुणवत्ता च दर्जा अबाधित राहणे बाबत घ्यावयाची काळजी , एखाद्या प्रकल्पामुळे दुसऱ्या प्रकल्पावर होणारे संभाव्य परिणाम, इ. बाबतचे महत्वाचे व सर्वांगीण निर्णय घेणे आवश्यक आहे.

प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी खालील तक्यात नमूद केल्याप्रमाणे पूर्वगणनपत्रकांच्या तांत्रिक मान्यतेचे अधिकार सुपूर्त करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचा हुद्दा | | पूर्वगणनपत्रक तांत्रिक मान्यता मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | उप अभियंता | | रक्कम रुपये १० लक्ष पर्यंत |
| २ | कार्यकारी अभियंता | | रक्कम रुपये १० लक्षच्या वर ५० लक्ष पर्यंत |
| ३ | खातेप्रमुख | | रक्कम रुपये ५० लक्षच्या वर १ कोटी पर्यंत |
| ४ | शहर अभियंता<br>सर्व मुख्य अभियंता<br>सर्व अधिक्षक अभियंता व संबंधित उपआयुक्त<br>अधिक्षक अभियंता (भवन) | - अध्यक्ष<br>- सदस्य<br>- सदस्य<br>- सदस्य सचिव | रक्कम रुपये १ कोटीच्या वर ३ कोटी पर्यंत |
| ४ | **एस्टिमेट कमिटी**<br>संबंधित विभागाचे अतिरिक्त महापालिका आयुक्त<br>शहर अभियंता<br>सर्व मुख्य अभियंता<br>सर्व अधिक्षक अभियंता व संबंधित उपआयुक्त<br>अधिक्षक अभियंता (भवन) | <br>- अध्यक्ष<br>- सह अध्यक्ष<br>- सदस्य<br>- सदस्य<br>- सदस्य सचिव | रक्कम रुपये ३ कोटीच्या वर २५ कोटी पर्यंत |
| ५ | **एस्टिमेट कमिटी**<br>महापालिका आयुक्त<br>संबंधित विभागाचे अतिरिक्त महापालिका आयुक्त<br>शहर अभियंता<br>सर्व मुख्य अभियंता<br>सर्व अधिक्षक अभियंता व संबंधित उपआयुक्त<br>अधिक्षक अभियंता (भवन) | <br>- अध्यक्ष<br>- सह अध्यक्ष<br>- सदस्य<br>- सदस्य<br>- सदस्य<br>- सदस्य सचिव | रक्कम रुपये २५ कोटीच्या वर |

सर्व कामांसाठी वर नमूद केल्याप्रमाणे पूर्वगणनपत्रक प्रस्तावांना मान्यता घेण्यात येवून ती प्रकरणे निविदा प्रकरणासोबत जोडण्यात यावीत. पूर्वगणनपत्रकांचे तपासणी व तांत्रिक मान्यतेबाबत यापूर्वी प्रसृत करण्यात आलेले या विषयीचे सर्व कार्यालयीन आदेश/परिपत्रके या आदेशान्वये अधिक्रमित करण्यात येत आहेत .

( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका